**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक २८ जून २०२४**

**ठळक बातम्या**

- **एकूण 6 लाख 12 हजार 293 कोटी खर्चाचा अतिरिक्त अर्थसंकल्प आज विधानसभेत सादर.**
- **विदर्भासाठी अर्थसंकल्पात अनेक महत्वपूर्ण तरतुदी- बुलढाणा इथं शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाची होणार स्थापना.**
- **अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना १५ जुलै पर्यंत मदत देण्याचं राज्य सरकारचं विधानसभेत आश्वासन.**
- **यवतमाळच्या नेर तालुक्यातील कोहळा लघुपाटबंधारे प्रकल्प ग्रस्तांना तातडीने भरपाई देण्यात यावी-जलसंधारण मंत्री संजय राठोड यांचे निर्देश.**
- **बहुप्रतीक्षित मान्सूनच्या आगमनाने वैदर्भीय सुखावले, नागपुरात सकाळी पावसाची हजेरी, संपूर्ण विदर्भात आजपासून तीन दिवस पावसाचा येलो अलर्ट.**

*****

राज्याचा अर्थसंकल्प

अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगाने अर्थसंकल्प वाचनाची सुरवात करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 27 फेब्रुवारी 2024 रोजी चालू आर्थिक वर्षाचा अंतरिम अर्थसंकल्प सादर केला होता. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अंतरिम अर्थसंकल्प सादर केल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या 2024-25 या अतिरिक्त अर्थसंकल्पात एकूण खर्चासाठी 6 लाख 12 हजार 293 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यात महसूली जमा 4 लाख 99 हजार 463 कोटी रुपये तर, महसुली खर्च 5 लाख 19 हजार 514 कोटी रुपये अंदाजित करण्यात आला आहे. वार्षिक योजना कार्यक्रम खर्चासाठी, एक लाख 92 हजार कोटी रुपये आणि अनुसूचित जाती उपयोजनेकरीता 15 हजार 893 कोटी रुपये, आदिवासी विकास उपयोजनेकरीता 15 हजार 360 कोटी रुपये तसंच जिल्हा वार्षिक योजनेसाठी 18 हजार 165 कोटी रुपयांचा नियत व्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. महसुली तूट 20 हजार 51 कोटी रुपये, राजकोषीय तूट 1 लाख 10 हजार 355 कोटी रुपये आहे. या अर्थसंकल्पात राज्याच्या सामाजिक आणि आर्थिक

प्रगतीसाठी विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत. यामध्ये महिलांसाठी 21 ते 60 वयोगटातील पात्र महिलांना प्रत्येकी दरमहा दीड हजार रुपये देणारी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना', महिलांना रिक्षा व्यवसायासाठी आर्थिक मदत देणारी 'पिंक ई-रिक्षा' योजना, 52 लाख कुटुंबांना वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत देणारी 'मुख्यमंत्री अन्नपूर्ण योजना', महिला लघुउद्योजकांसाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्टार्टअप योजना', आदींचा समावेश आहे. तर शेतकऱ्यांसाठी 'मुख्यमंत्री बळीराजा सवलत योजनें' अंतर्गत राज्यातील 44 लाख शेतकऱ्यांना मोफत वीजपुरवठा करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे शेती कृषी पंपांचे थकीत बिल माफ करण्यात येणार असून दुधउत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलिटर पाच रुपये अनुदान देण्यात येणार आहे. राज्यातील दहा लाख युवकांना प्रत्यक्ष कामावर प्रशिक्षण आणि दरमहा दहा हजार रुपयांपर्यंत विद्यावेतन देणाऱ्या 'मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजने'ची घोषणा देखील या अर्थसंकल्पात करण्यात आली. तसंच अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना विदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबाना २५ लाखांची मदत देण्याची तरतुद करण्यात आली आहे. दिव्यांगांसाठी "आनंद दिघे" घरकुल योजना आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात संशोधनासाठी १०० कोटींची तरतूद देखील या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

विदर्भ विषयक घोषणा

विदर्भासाठी अनेक महत्वपूर्ण घोषणा अर्थसंकल्पत करण्यात आल्या आहेत. यात पायाभूत सुविधा आणि अन्य क्षेत्रातील महत्वाच्या योजनांमध्ये

- मुंबई, पुणे आणि नागपूर शहरांमध्ये एकूण 449 किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गिका उभारण्यास मान्यता देण्यात आली असून, 127 किलोमीटर लांबीच्या मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या करण्यात येणार आहे.
- नागपूर जिल्ह्यातील रामटेक विकास आराखड्याच्या दुसऱ्या टप्प्यात २११ कोटी रुपये किमतीची कामे हाती घेण्यात येणार आहे.
- धर्मादाय आयुक्तांच्या अधिपत्याखालील कार्यालयांच्या वर्धा, आणि अमरावती इथल्या इमारतींच्या बांधकामासाठी तसेच इमारतींच्या नूतनीकरणासाठी 125 कोटी रुपयांचा निधी देऊ करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे, युवा वर्गासाठी, नागपूर, अमरावती, यवतमाळ, इथल्या तंत्रशिक्षण संस्थांमध्ये 'सेंटर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तर पायाभूत प्रकल्पनामध्ये, वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प तसच  नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला आणि बुलढाणा जिल्ह्यातील 3 लाख 71 हजार 277 हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ यांचा समावेश आहे. बुलढाणा इथं शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाची स्थापना करण्याची घोषणा करण्यात आली आहे. नागपूरच्या धर्तीवर नुकसानीचे पंचनामे जलद आणि पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली संपूर्ण राज्यात लागू करण्याचा निर्णय देखील अर्थ संकल्पत घेण्यात आला आहे.

अर्थ संकल्प प्रतिक्रिया

'या अर्थ संकल्पातून शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी, युवक, महिला, मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक अशा सर्व घटकांना न्याय, शेती, उद्योग, शिक्षण, व्यापार, आरोग्य, पर्यटन अशा विविध क्षेत्रांच्या विकासाला बळ देण्याचा आम्ही प्रयत्न केल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. आज अर्थसंकल्प सादर केल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. वारकरी बांधवांसाठी ‘मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ’, वारीतल्या मुख्य पालख्यातील दिंड्यांना प्रतिदिंडी 20 हजार रुपयांचे अर्थसहाय्य आणि ‘निर्मलवारी’साठी 36 कोटींचा निधी  याप्रकारच्या योजना या आधी राबविल्या गेल्या  नसल्याच पवार म्हणाले. अतिशय प्रगतिशील, सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय असा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल  देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांचं अभिनंदन केलं आहे. हा सर्वसामान्यांचा अर्थसंकल्प असून शेतकऱ्यांसाठी नुकसानभरपाई आणि इतर निधींपोटी 45 हजार कोटी रुपये आमच्या सरकारनं दिलेले आहेत. महिला आणि बेरोजगारांना आर्थिक ताकद देण्याचं आमचं उद्दिष्ट असून  सरकार सर्वसामान्यांचं, त्यांची काळजी घेणारं आहे अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. दरम्यान, विरोधी पक्षांतील नेत्यांनी या अर्थसंकल्पावर टीका केली आहे. हा अर्थसंकल्प अत्यंत बेजबाबदार असून वीज बिल माफ केल्यासारखं दाखवल आहे पण  शेतकऱ्यांच्या थकीत वीज बिलाबद्दल कोणताही उपाय यात दिलेला नाही अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे. सरकारनं वारकऱ्यांची फसवणूक करत असल्याचंही यावेळी ठाकरे म्हणाले. तर अडिच वर्ष फक्त घोटाळे, टेंडर, कमिशन, टक्केवारी यातून मालामाल झालेल्या या महाभ्रष्टाचारी सरकारनं आता निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अतिरिक्त अर्थसंकल्पाच्या नावाखाली महायुतीचा निवडणूक जाहीरनामाच सादर केला आहे, अशा शब्दात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी अतिरिक्त अर्थसंकल्पावर टिकास्र डागले आहे.

विधान सभा कामकाज

विधिमंडळ अधिवेशनाचा आज दुसरा दिवस आहे. सकाळच्या सत्रात अवकाळी पावसानं नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना १५ जुलै पर्यंत मदत देऊ असं आश्वासन, राज्य सरकारनं आज विधानसभेत दिलं. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता. अवकाळी पावसानं राज्यातल्या सुमारे २ लाख ९१ हजार हेक्टर  शेतीच नुकसान झाल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी दिली. शेतकऱ्यांना नेमकी किती मदत देणार याचा आकडा जाहीर करण्याची मागणी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली. त्यावर उपग्रहाद्वारे पाहणी करण्याऱ्या NDVI अर्थात normalise difference vegetation index निकषांचा वापर होतो आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी करतील तेवढा निधी मंजूर करू असं आश्वासन पाटील यांनी दिलं. तर सर्व सामान्यांना परवडेल अशा दरात वाळू उपलब्ध होण्यासाठी सरकार धोरण निश्चिती करत असून या धोरणामध्ये अधिक सुलभता कशी येईल हाच सरकारचा प्रयत्न आहे. त्याबाबत काही सुचना आल्यास त्यांचा स्विकार सरकार करेल अशी ग्वाही महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

विधान परिषद कामकाज

राज्यातल्या औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांमधल्या हजारो जागा रिक्त असण्याबद्दलचा तारांकित प्रश्न विधान परिषदेत आज मांडण्यात आला. यासंबंधी बृहत आराखडा तयार करून त्यानुसार पुढची कार्यवाही केली जाईल असं उत्तर, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिलं. कमी वेतनाच्या विरोधात आझाद मैदानावर आंदोलनाला बसलेल्या प्राध्यापकांचा मुद्दा आमदार मनिषा कायंदे यांनी मांडला. याबाबतची पुढची कारवाई लवकरात लवकर केली जाईल, असं आश्वासन पाटील यांनी दिलं.

धर्मेंद्र प्रधान

नीट पेपरफुटी प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असं आश्वासन  शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी NEETच्या विद्यार्थ्यांना दिलं आहे. संसदेबाहेर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, सरकार या विषयावर संवेदनशील असून सर्व आवश्यक कारवाई केली जाईल. तत्पूर्वी नीट परिक्षेतल्या गैरव्यवहाराच्या मुद्यावरुन विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळ संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आज बाधित झालं. लोकसभेत कामकाज सुरु होताच विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी नीट परिक्षेप्रकरणी चर्चेची मागणी केली. तर राज्यसभेतही विरोधकांनी नीट प्रकरणी

चर्चेची मागणी लाऊन धरली. काही सदस्यांनी सभापतींच्या आसनासमोर येऊन घोषणाबाजी केल्यानं सभापती जगदीप धनखड यांनी सदनाचं कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित केलं होतं.

संजय राठोड

यवतमाळच्या नेर तालुक्यातील कोहळा लघुपाटबंधारे प्रकल्पामधील बुडीत क्षेत्रातील 190 रहिवासी भूखंडधारकांच्या अतिक्रमित जमिनीची मालकी दिवाणी न्यायालयानं विधिवत मान्य केली असल्यामुळ सानुग्रह अनुदानाचा पर्याय स्वीकारून तातडीन भरपाई देण्यात यावी, असे निर्देश मृदा आणि जलसंधारण मंत्री तथा पालकमंत्री संजय राठोड यांनी दिले. कोहळा लघु पाटबंधारे प्रकल्पामध्ये मौजे कोहळ आणि पिंपळगाव काळे इथली 385 कुटुंबं बुडिताखाली गेलेली होती. त्यांचं पुनर्वसन करण्यात आलं आहे. त्यातील 190 कुटुंबांनी बांधलेली घरं अतिक्रमीत जागेवर असल्यानं भूसंपादन निवाड्यामध्ये जागेची भरपाई मिळाली नव्हती, त्यामुळे 11 प्रकल्पग्रस्तांनी दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला होता. दिवाणी न्यायालयाने उपरोक्त सर्व प्रकल्पग्रस्तांची अतिक्रमित जमिनीची मालकी मान्य करून निवाड्यामधील भरपाई रकमेमध्ये वाढ केली आहे.

हवामान

विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये येत्या 30 तारखेपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान आज सकाळपासून ढगाळ वातावरणासह नागपुरात बहुप्रतीक्षित अश्या पावसानं हजेरी लावली. गेले काही दिवस ढगाळ वातावरण असून सुद्धा पाऊस नसल्यानं उकाड्यात प्रचंड वाढ झाली होती. आज सकाळपासून मध्यम स्वरूपाचा पाऊस झाल्यानं शेतकऱ्यांसह नागरिक सुखावले आहेत. पावसानी अशीच सातत्यान हजेरी लावल्यास शेतीच्या कामाला अधिक गती मिळणार आहे. भंडारा इथं देखील आज सकाळी जोरदार पाऊस झाल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीनं दिली आहे. तर यवतमाळच्या महागाव तालुक्यातील अधर पूस प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात चांगला पाऊस होत असल्यानं प्रकल्पातील जलाशयाच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. सदर पाणी पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रकल्पाची दोन दारं २४ सेंटिमीटरनं उघडून त्यातून ४८ क्युसेक पाण्याचा विसर्ग नदीपात्रात करण्यात आला आहे. परिसरात काल रात्रीपासून पावसाची संततधार सुरू आहे. 'सचेत' या राष्ट्रीय आपत्ती सतर्कता पोर्टल मार्फत आगामी 24 तासात चंद्रपूर, गडचिरोली आणि नागपूर इथं तुरळक ठिकाणी

मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यादरम्यान सतर्क राहून अप्रिय घटनेपासून स्वतःचा बचाव करण्याचा सल्ला देखील देण्यात आला आहे.

*****